MHRG090003552017

नियमित दिवाणी दावा ३२/२०१७

जनाबाई वि. अमोल

## निशाणी क्रमांक ६० वर आदेश

प्रस्तूतचा अर्ज वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चा क्रम २६ नियम ०९ नुसार अतिक्रमण दूर करून दाव्यामध्ये न्यायालयीन आयुक्त म्हणून मौजे नागोठणे तालुका रोहा येथील सर्वे क्रमांक १५८/२, ब/२ क्षेत्र हेक्टर ०.७२.० आर पैकी पनवेल–इंदापूर रस्त्यासाठी संपादित क्षेत्र हेक्टर ०.१४.० आर, आकार रक्कम १.२० पैसे वाद मिळकतीची फेर मोजणी करून मोजणी नकाशा आणि अहवाल दाखल करण्यासाठी न्यायालयीन आयोग नेमणूक होण्यासाठी केला आहे.

०२. वादीचे थोडक्यात कथन असे की, न्यायालयाच्या आदेशानुसार मोजणी रजिस्टर नंबर ३०/२०१९ चा अहवाल न्यायालयासमोर आला आहे. त्यात प्रतिवादीचे व वादीचे कथित क्षेत्र दर्शविण्यात आले आहे व कथित वादाचे क्षेत्रही दर्शविण्यात आले आहे. परंतु टिपांमधील मजकूर मोघम व अनाकलनीय आहे. तसेच आकृतीत दाखवल्याप्रमाणे क्षेत्रांमध्येही तफावत आहे. दरम्यान कोविडचा कालावधी असल्यामुळे वादी वकिलांशी संपर्क साधू शकला नाही. वादी पॅरालिसिस व सोरायसिस आजारामुळे त्रस्त झाली. आजही वादी पुणे हॉस्पिटल मध्ये दाखल आहे. आजारपणामुळे वादी व अख्त्यारीची मानसिक स्थिती ढासळली व दाव्यात वेळीच कारवाई करणे शक्य झाले नाही.

०३. वादी पुढे असे कथन करतात की, वादी चे खरेदीखत आहे. चतु:सिमा आहे, नकाशा आहे. तसेच ०–१४–० क्षेत्र महामार्गाकरिता संपादन झाल्याची कागदपत्रे आहेत. मोजणी खातेकडे मूळ अभिलेख आहे. असे असता संबंधित मोजणीदार यांनी उभयंताचे कथन, कागदपत्रे, अभिलेख यांची दखल न घेता अहवाल दिला व अचूक मोजणी व्हावी व संदिग्धता

राहू नये यासाठी वादीने खाजगी मोजणीद्वारे नकाशाही तयार केला ज्यायोगे मोजणीदार यास मोजणीमध्ये सहाय्य मिळेल. परंतु, कमिशन मोजणीदारने आवश्यक दक्षता बाळगली नाही. त्यामुळे प्रस्तुत कमिशन अहवालावरून वादाचे आकलन होत नाही. वस्तुस्थिती न्यायालयासमोर आली नाही यासाठी फेरकमिशनचा अर्ज देणे भाग झाले आहे.

०४. प्रतिवादीने सदर अर्जात हरकत घेऊन फेर मोजणीची आवश्यकता नसल्याचे सांगितले आहे.

०५. वादीच्या वकिलांनी असा युक्तिवाद केला की, हद्दीवरून वाद असेल व क्षेत्राची व मिळकतीची ओळख यासाठी दिवाणी प्रक्रिया साहित्यामध्ये व कमिशन मोजणी दाराचे कामांमध्ये त्रुटी असल्यास त्यामुळे पक्षकारांची हक्कास बाधा येऊ नये फेर कमिशन करण्यात यावे ज्यायोगे वादाचे अंतिम निराकरण होईल असे मुंबई व माननीय सर्वोच्च न्यायालय यांनी न्यायनिर्णयात स्पष्ट केले आहे. वादी त्यासाठी खर्च सोसणेस तयार आहे. प्रतिवादी मोजणीस हजर राहू शकतो व त्यास उलट तपासण्याची संधी आहे. त्यामुळे प्रतिवादीचे ब चा वास बाधा येत नाही.

०६. कमिशनच्या अहवालाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, सदरचा अहवाल वादाचे निराकरण करण्यास सहाय्य करत नाही. त्यामुळे उपाधिक्षक भुमिअभिलेख रोहा यांना निर्देशित करण्यात येते की, या दाव्यातील वादीचे व प्रतिवादीचे कथन कागदपत्रे, नकाशा दस्त व इतर सूचना यांची दखल घेऊन उभय पक्षकार व संबंधित हिस्सेदार समक्ष मोजणीकरून जरूर तर प्रत्येकाचे क्षेत्राचा हिस्सा पाडण्याच्या दृष्टीने मोजणी करून हद्द करावी व वस्तू स्थिती बाबत सुस्पष्ट टिपा व आकृती आकलन होईल असे योग्य परिमाण वापरून नकाशा सादर करावा.

## <u>आदेश</u>

०१. वादीचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

०२. दिवाणी प्रक्रिया संहिता १९०८ चा क्रम २६ नियम ०९ वाचनीय कलम ७५ (ब) उप अधिक्षक भुमिअभिलेख रोहा यांची न्यायालयीन आयुक्त म्हणून मौजे

नागोठणे तालुका रोहा येथील सर्वे नंबर १५८/२, ब/२ क्षेत्र हेक्टर ०.७२.० आर पैकी पनवेल–इंदापूर रस्त्यासाठी संपादित क्षेत्र हेक्टर ०.१४.० आर, आकार रक्कम १.२० पैसे या वाद मिळकतीचे फेरनिरीक्षण करून आयोग पत्र मिळाल्यापासून दोन महिन्याच्या आत नकाशा काढून दाखल करण्यासाठी नेमणूक करण्यात येत आहे.

०३. वादीने उपाध्यक्ष भुमिअभिलेख रोहा यांच्या कार्यालयात त्यांच्या सूचनेनुसार आवश्यक शुल्क नियमाप्रमाणे अदा करावे व आयोगपत्र विनाविलंब जारी करण्यासाठी शुल्क पावतीची सत्यप्रत अभिलेखावर दाखल करावी.

०४. वादी व प्रतिवादीला ते ज्या मालकी हक्क दस्तऐवज व महसूल किंवा इतर कागदपत्रांवर भरवसा ठेवतात अशा कागदपत्रांच्या दोन प्रमाणित सत्य प्रती व एक छायांकित प्रत दाखल करण्याचा निर्देश देण्यात येतो.

०५. न्यायालयीन आयुक्ताला दिवाणी प्रक्रिया संहिता १९८० कलम ७५ ते ७८ क्रम २६ व अंतर्गत नियम तसेच दिवाणी नियमावलीतील प्रकरण क्रमांक १५१ ते १७० व महसूल नियमावलीतील आवश्यक नियमांचा अवलंब करून आयोगाचे कार्य सत्वर पूर्ण करण्याचे व मोजणी नकाशा व अहवाल दाखल करण्याचे निर्देशित करण्यात येते. आयोगाचे काम काही अपरिहार्य कारणांमुळे उपरोक्त ठरवून दिलेल्या मुदतीत पूर्ण होऊ शकले नाही तर न्यायालयीन आयुक्त उपरोक्त मुदत संपण्यापूर्वी न्यायालयाकडे लेखी अर्ज करून मुदत वाढ मागू शकतात.

०६. उभय पक्ष्यांना जातीने अथवा विधीज्ञांमार्फत न्यायालयीन आयुक्ताने नेमलेल्या तारखेला व वेळी हजर राहण्याचे निर्देशित करण्यात येते.

०७. जर आयोगाच्या ठरलेल्या दिवशी तारखेला व वेळी कोणताही पक्ष हजर न राहिल्यास न्यायालयीन आयुक्तांनी तसा पंचनामा करून आयोगाचे कार्य उपस्थित पक्षकारासमक्ष पूर्ण करावे.

०८. वादीने आदेश कलम कलम ३, ४ व ७ ची पूर्तता तात्काळ करावी.

०९. अर्जाचा खर्च दाव्यात समाविष्ट करण्यात येतो.

MEGHA CHANDRAKANT HASGE

Digitally signed by MEGHA CHANDRAKANT HASGE
Date: 2023.08.18 13:16:39 +0530

स्थळ – रोहा. (मेघा चं. हासगे)

दिनांक – १७/०८/२०२३. सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, रोहा.